२५ लाख रोजगार निर्मितीसह शेतकऱ्यांची कर्जमाफी >>पान 2

जगप्रसिद्ध सारंगी वादक पंडित राम नारायण यांचे निधन; शासकीय इतमामात होणार अंत्यसंस्कार >>पान 3

सोमवारी ॲड. प्रकाश आंबेडकर यांची मेहकर येथे जाहीर सभा >>पान 4

# दैनिक आपला विदर्भ

सुविचार

आत्मविश्वासाने आपण कोणत्याही आव्हानांना सामोरे जाऊ शकतो.

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



गरोदरपणात 'ही' अभिनेत्री खातेय गोमूत्र आणि शेणापासून बनवलेले तूप, सांगितले फायदेही

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 92 ■ रविवार, दि. 10 नोव्हेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# महायुतीच्या लोकप्रिय आश्वासनांमुळे तिजोरीवर दीड ते दोन लाख कोटींचा अधिक आर्थिक भार ?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई /प्रतिनिधी: विधानसभा निवडणुकीसाठी महायुतीने जाहीर केलेल्या आश्वासन दशसूत्रीची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य सरकारला किमान दीड लाख कोटी रुपयांहून अधिक आर्थिक भार उचलावा लागणार आहे. सरकारने निवडणुकीआधी जाहीर केलेल्या अनेक घोषणा व योजनांमुळे शासकीय तिजोरीवर मोठा ताण असून राज्यावरील कर्जाचा बोजा सात लाख ११ हजार २७८ कोटी रुपयांवर गेला आहे. महायुतीचा जाहीरनामा किंवा दशसूत्रीची अंमलबजावणी केल्यास कर्जाचा बोजा आणखी वाढणार आहे. तर महाविकास आघाडीनेही आश्वासनांचा पाऊस पाडला असून त्याची अंमलबजावणी करायची झाल्यास दोन लाख कोटी रुपयांपर्यंत आर्थिक बोजा पडण्याची शक्यता आहे.**

निवडणूक काळात सर्वच राजकीय पक्षांकडून जनतेवर आश्वासनांची खैरात होते. महायुतीनेही सत्तेवर आल्यास घेणार असलेल्या निर्णय व योजनांची दशसूत्री जाहीर केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) स्वतंत्र जाहीरनाम्यात आणखी काही आश्वासने दिली आहेत. महायुतीच्या दशसूत्री व राष्ट्रवादी काँग्रेसच्या जाहीरनाम्यामध्ये शेतकरी कर्जमाफी, वार्षिक १५ हजार रुपये आणि नियमित कर्जफेड करणाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता, लाडक्या बहिणींना दरमहा २१०० रुपये, वयोवृद्धांना २१०० रुपये मानधन, जीवनावश्यक वस्तूंचे दर पाच वर्षे स्थिर ठेवणार, २५ हजार महिला पोलिसांची भरती, २५ लाख रोजगारनिर्मिती, ४५ हजार गावांमध्ये रस्ते, अंगणवाडी कर्मचारी व आशा सेविकांना दरमहा १५ हजार रुपये वेतन व विमासुरक्षा, वीजबिलात ३० टक्के कपात आदी आश्वासनांचा समावेश आहे.

महाविकास आघाडी सरकारच्या काळात झालेल्या शेतकरी कर्जमाफी व नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकरयांना प्रोत्साहन योजना जाहीर करण्यात आली होती. राज्यात सुमारे अडीच कोटी कृषी खातेदार असून राज्य सरकार सध्या वार्षिक सहा हजार व केंद्र सरकार सहा हजार रुपयांचे अर्थसहाय्य देते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या या योजनांसाठी सुमारे ३८-४० हजार कोटी रुपयांहून अधिक निधी लागणार आहे. किती रकमेपर्यंत कर्ज माफ करायचे, याच्या निर्णयावर निधीची तरतूद



अवलंबून राहील. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी राज्य सरकार सध्या दरमहा १५०० रुपये देत असून त्यासाठी वार्षिक ४६ हजार कोटी रुपयांचा निधी लागणार आहे. या रकमेत वाढ करुन दरमहा २१०० कोटी रुपये देण्याचा प्रस्ताव असून त्यासाठी सुमारे ६५ हजार कोटी रुपयांचा निधी लागण्याची शक्यता आहे. जीवनावश्यक वस्तूंचे दर स्थिर ठेवण्याची घोषणा १९९५ च्या निवडणुकीच्या वेळी करण्यात आली होती. तत्कालीन शिवसेना-भाजप युती सरकारने शिधावाटप दुकानांमधील पाच जिन्नस किंवा वस्तूंचे दर पाच वर्षे स्थिर ठेवले होते. त्यासाठी केंद्र व राज्याचे सध्याचे अनुदान व दर लक्षात घेता किमान चार-पाच हजार कोटी रुपयांचा निधी लागण्याची शक्यता आहे. वस्तूची किंमत कधीची धरायची, यावर हा खर्च अवलंबून आहे. वयोवृद्धांना २१०० रुपये मानधन, अंगणवाडी व आशासेविकांच्या वेतनात वाढ आदींसाठीही मोठा निधी लागणार आहे. राज्यातील ४५ हजार गावांमध्ये रस्त्यांसाठीही किमान १५ ते २० हजार कोटी रुपयांचा निधी लागणार असून त्यातील बहुतांश निधी खासगी क्षेत्राकडून उभारला जाईल आणि पथकराच्या माध्यमातून वसुली होईल. यामध्ये सरकार किती आर्थिक बोजा स्वीकारणार, यावर निधीची तरतूद अवलंबून राहील.

राज्यावर सध्या सात लाख ११ हजार २७८ कोटी रुपये कर्जाचा बोजा असून निवडणुकीसाठी केलेल्या लोकप्रिय घोषणांमुळे आर्थिक वर्ष अखेरीस त्यात मोठी वाढ होण्याची शक्यता आहे. २०२१-२२ या आर्थिक वर्षात कर्जाचा बोजा ५,७६,८६८ कोटी रुपये, तर २०२२-२३ मध्ये ६,२९,२३५ कोटी रुपये इतका होता. कर्जाच्या बोजा वाढत असला तरी त्याचे प्रमाण सकल राज्य उत्पन्नाच्या (जीएसडीपी) १७.६ टक्के इतके असून ते रिझर्व्ह बँकेने घालून दिलेल्या कमाल मर्यादेपेक्षा कमी आहे.

## महाविकास आघाडीचाही आश्वासनांचा पाऊस

निवडणूक आश्वासनांमध्ये महाविकास आघाडीही कमी नसून त्यांचे सरकार आल्यावर अंमलबजावणी करायची झाल्यास आर्थिक बोजा दोन लाख कोटी रुपयांपर्यत पडण्याची शक्यता आहे. महाविकास आघाडीने शेतकऱ्यांचे तीन लाख रुपयांपर्यतचे कर्ज माफ करण्याची घोषणा केली आहे. ठाकरे सरकारच्या काळात दोन लाख रुपयांपर्यतचे कर्ज माफ करण्यात आले होते. त्यामुळे नवीन कर्जमाफी व प्रोत्साहन योजनेसाठी ५०-६० हजार कोटी रुपये लागती. आघाडीने लाडकी बहीण योजनेतील मानधन दरमहा तीन हजार रुपये देण्याची घोषणा केली आहे. त्यासाठी सध्याच्या दुप्पट म्हणजे सुमारे ९२ हजार कोटी रुपयांची आर्थिक तरतूद करावी लागेल.



## भिवंडीत एकनाथ शिंदेंचं बळ वाढलं, ताकदवान माजी आमदाराचा शिवसेनेत प्रवेश!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई /प्रतिनिधी:** विधानसभा निवडणुकीचा प्रचार सध्या शिगेला पोहोचला आहे. राज्यातील सर्वच पक्ष पूर्ण तकादीने आपापल्या उमेदवारांचा प्रचार करत आहेत. प्रमुख नेतेमंडळी तर एका दिवसात चार-चार सभा घेत आहेत. मतदानाला कमी कालावधी शिल्लक राहिल्यामुळे संपूर्ण महाराष्ट्र कसा पिंजून काढता येईल? यासाठी सर्वच पक्ष प्रयत्नरत आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे हेदेखील यात मागे नाहीयेत. संपूर्ण महाराष्ट्रात त्यांच्या सभा होत आहेत. दरम्यान, या पक्षाकडून पूर्ण ताकदीने निवडणूक लढवली जात असताना या पक्षाला भिंवडीमध्ये मोठा झटका बसला आहे. भिवंडीतील भिवंडी ठाकरे गटाचे लोकसभा संपर्क प्रमुख व माजी आमदार रुपेश म्हात्रे यांनी ठाकरे यांची साथ सोडती एकनाथ शिंदे यांच्या पक्षात प्रवेश केला आहे. या पक्षप्रवेशाळी म्हात्रे याचे शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. म्हात्रे यांनी शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश करताच त्याच्यावर शिंदे यांनी उपनेतेपदाची जबाबदारी सोपवली आहे. म्हात्रे या विधानसभा निवडणुकीत भिवंडी पूर्व या जागेसाठी इच्छूक होते. परंतु महाविकास आघाडीच्या वाटाघाटीत ही जागा समाजवादी पक्षाला सुटली. महाविकास आघाडीकडून या जागेसाठी समाजवादीचे रईस शेख हे निवडणूक लढवत आहेत. त्यामुळेच म्हात्रे हे नाराज होते. तिकीट न मिळाल्याने म्हात्रे यांनी अनेकवेळा आपली नाराजी बोलून दाखवली होती. एका सभेत बोलताना म्हात्रे यांनी उद्धव ठाकरे व आदित्य ठाकरे यांच्या विरोधात विधान केले होते. त्यानंतर त्यांना ठाकरेंच्या शिवसेनेन बाहेरचा रस्ता दाखवला होता. आता ८ नोव्हेंबर रोजी रात्री उशिरा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थित म्हात्रे यांनी शिंदे गटात प्रवेश केला आहे. दरम्यान, आता मतदानासाठी मोजकेच दिवस शिल्लक राहिल्यामुळे प्रचाराला वेग आला आहे. प्रमुख नेत्यांचे आगामी दिवसांतील सभांचे नियोजन ठरले आहे. त्यामुळे भविष्यात आरोप-प्रत्यारोप पाहायला मिळणार आहेत.

## मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर भीषण अपघात, ३६ प्रवाशांच्या बसची ट्रकला धडक

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई पुणे एक्सप्रेस वेवर ट्रक आणि खासगी बसचा भीषण अपघात झाला. खासगी बसने उभा असलेल्या ट्रकला मागून धडक दिली. या धडकेत २६ प्रवासी जखमी झाले असून यातील ८ जण गंभीर असल्याची माहिती समजते. जखमींना रुग्णालयात दाखल केले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. अपघातानंतर एक्सप्रेस वेवर वाहतूक कोंडी झाली होती. अपघातग्रस्त वाहने बाजूला केल्यानंतर वाहतूक सुरळीत झाली.

याबाबत मिळालेली माहिती असी की, मुंबई पुणे एक्सप्रेस महामार्गावर पुणे मुंबई लेनवर हा अपघात झाला. खोपोली हद्दीत बोरघाट उतरत असताना बोगद्यात एक ट्रक पंक्चर झाल्यानं तिसऱ्या लेनमध्ये उभा होता. बस चालकाला हे लक्षात आलं नाही आणि बस जोरात ट्रकला धडकली. बसमधून ३८ प्रवासी प्रवास करत होते. त्यात ८ जण गंभीर जखमी झाले तर १८ जण किरकोळ जखमी झाले आहेत.

## राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या धाडीत परराज्यातील दारू

### ४ वाहनांसह ४० लाखांहून अधिकचा मुद्देमाल जप्त

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधानसभा निवडणूक-२०२४ च्या कालावधीत राज्य उत्पादन शुल्क विभागाने केलेल्या कारवाईत परराज्यातील दारू तसेच ४ वाहनांसह ४० लाख ६४ हजार ३६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

राज्य उत्पादन शुल्क, मुंबई विभागाचे आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी, संचालक प्रसाद सुर्वे, पुणे विभागीय उपआयुक्त सागर धोमकर, अधीक्षक, चरणसिंग राजपूत, उप-अधीक्षक, संतोष जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क डी विभागाकडून २७ ऑक्टोबर २०२४ रोजी घोटावडे गावच्या हद्दीत, आंबटवेट रोडवर दारूबंदी गुन्ह्याकामी सापळा लावून टाटा कंपनीचे एस गोल्ड या प्रकाराचे चारचाकी वाहन क्र. चक १२ ढत५१२२ पकडले. या वाहनामधून गोवा राज्य निर्मित व महाराष्ट्र राज्यात विक्रीस प्रतिबंधित असलेली विदेशी दारूचे एकूण १८ बॉक्स (८६६ सिलबंद बाटल्या) तसेच महाराष्ट्र राज्याचे बनावट लेबल असा एकूण ३ लाख ५५ हजार १४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून आरोपीस अटक करण्यात आली. न्यायालयाने आरोपीस ३ दिवस एक्साईज कोठडी मंजूर केली. पुढील तपासात ४ नोव्हेंबर २०२४ रोजी कोथरूड, कर्वे पुतळ्याजवळ तपासाकामी छापा टाकला असता सदर गुन्ह्यासाठी वापरण्यात येणारे विविध बॅन्डचे विदेशी मद्याचे एकूण १०,००० नग बनावट लेबलसह सापडले आहे. याची एकूण किंमत ८८,१६० रुपये आहे. या गुन्ह्यातील पुढील तपासात दिनांक ६ नोव्हेंबर २०२४ रोजी शनिवार पेठ, येथून बनावट लेबल छपाई करण्यासाठी वापरण्यात आलेल्या मशीनसह एकूण ३० लाख २ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या गुन्ह्यात एकूण ३४ लाख ४५ हजार ५५० रुपयांच्या मुद्देमालासह एकूण ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

ही कारवाई निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, डी विभाग सचिन श्रीवास्तव, ई विभागाचे निरीक्षक, शैलेश शिंदे, स.दु.नि. स्वप्नील दरेकर, स.दु.नि.सागर धुर्वे, जवान श्री. गजानन सोळंके, जवान श्री. संजय गोरे, यांनी सदर कारवाई मध्ये सहभाग घेतला असून पुढील तपास निरीक्षक, सचिन श्रीवास्तव करीत आहेत.

या विभागाने १ ऑक्टोबर २०२४ पासून आजपर्यंत एकूण ३१ गुन्हे नोंद करून ३१ आरोपींना अटक करून ४ वाहनांसह एकूण ४० लाख ६४ हजार ३६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यामध्ये गावठी दारू ९९१ लिटर, कच्चे रसायन १६०० लिटर, ताडी २२७ लिटर, देशी दारू ३३.०० ब. लि., बिअर २५५ ब. लि. व परराज्यातील गोवा निर्मित मद्य एकूण १५५.८८ ब. लि. यांचा समावेश आहे. ही कारवाई विभागाचे दुय्यम निरीक्षक विजय सूर्यवंशी, गणपती थोरात, श्रीमती शीतल देशमुख जवान श्रीमती वृषाली भिटे यांनी केली केली.

## '१५ वर्षात काय केलं', तरूणाच्या प्रश्नावर भाजप आमदार भडकले, सभेत तुफान राडा

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी सध्याच सर्वच नेत्यांची जोरबैठका घ्यायला सूरूवात केली आहे. दिवसरात्र भेटीगाठी सूरू आहेत.अशात आता एका बैठकीत एका सामान्य तरुणाने भाजप आमदार प्रशांत बंब यांना तुम्ही १५ वर्षात काय केलं? अशा प्रश्न केला.या प्रश्नानंतर प्रशांत बंब चांगलेच भडकले आहे. आणि त्यांची तरूणाशी थोडी वादावादी झाली आणि नंतर भापज कार्यकर्त्यांनी त्याला बैठकीतून बाहेर काढले.या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होतं आहे.

गंगापूर खुलताबाद मतदार संघामध्ये आमदार प्रशांत बंब यांनी एक गाव बैठक बोलावली होती. या बैठकीत गावकऱ्यांशी संवाद साधताना, एका सामान्य तरूणाने तुम्ही १५ वर्षात काय काम केलंत? असा सवाल केला. यावर प्रशांत बंब तरूणाला म्हणाले, मी नसलो तर तुला पश्चाताप होईल, इतकी वाईट परिस्थिती होईल. तुला पश्चाताप होईल,मरेपर्यंत पश्चाताप होईल,असे प्रशांत बंब यांनी सांगितले.

तु आता दादागिरी करतोय. याला न्या रे मागे असे प्रशांत बंब यांनी म्हणताच भाजप कार्यकर्त्यांनी उठून तरूणाला बैठकीतून हिसकावून लावले.तसेच त्याला कार्यकर्त्यांला मारहाण केल्याची घटना घडल्याची माहिती आहे.या घटनेचा व्हिडिओ आता मोठ्या प्रमाणावर सोशल मीडियावर व्हायरल होतं आहे.

हे मतदारसंघात प्रचारासाठी फिरत असताना गवळीशिवरा येथे काही सामान्य नागरिकांनी त्यांना विकासाबद्दल प्रश्न विचारले आणि तुम्ही पंधरा वर्षात काय केले असे विचारले असताना त्यांनी त्या सामान्य नागरिकाला चांगलेच धारेवर धरले, सामान्य नागरिकांनी तरी देखील प्रश्न विचारले असता याला बाहेर घ्या म्हणत कार्यकर्त्यांनी त्याला मारहाण करत बाहेर काढले.

## वंचितच्या उमेदवार डॉ.सौ. ऋतुजा चव्हाण यांना मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

### गावागावात प्रचार दौरा : युवकांनी दिला पाठिंबा तर ज्येष्ठांनी दिले आशीर्वाद

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर लोणार विधानसभा मतदार संघातील वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार सामाजिक कार्यकर्त्या, युवा नेतृत्व उच्च शिक्षित व्यक्तिमत्व डॉ.सौ.ऋतुजा ऋषांक चव्हाण यांनी शनिवार दि. ९ नोव्हेंबर रोजी मेहकर मतदार संघातील गावागावात प्रचार दौरा केला असता यावेळी युवकांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वांनीच डॉ. सर्व ऋतुजा ऋषांक चव्हाण यांना उस्त्फूर्त प्रतिसाद देत विजयाचे आशीर्वाद दिले. मेहकर लोणार मतदार संघात वंचित बहुजन आघाडीचे तसेच मित्रपक्ष क्रांतिकारी शेतकरी संघटना यांच्याकडून उच्च विद्याविभूषीत, सामाजिक कार्याची, गोरगरिबांच्या अडअडचणीची जाण असलेले व्यक्तीमत्व डॉ.सौ.उमेदवारी देण्यात आली आहे. त्यांचा प्रचाराचा झंजावतही सुरू झाला असून शनिवार दि. ९ नोव्हेंबर २०२४ रोजी मतदारसंघातील लोणार येथे सकाळी ९ वाजता किन्ही येथे दुपारी १ वाजता, तांबोळा येथे दुपारी २ वाजता प्रचार दौरा करण्यात आला. दुपारी ३ वाजता गायफळ येथे, सायंकाळी ५ वाजता शिवनी पिसा येथे, सायंकाळी ६ वाजता अंजनी खुर्द या ठिकाणी वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार



डॉ. ऋतुजा चव्हाण यांचा प्रचार दौरा व गाव भेटी दौरा आयोजित करण्यात आला होता. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे प्रचंड पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मतदार संघातील युवक, युवती, महिला यासह ज्येष्ठांनी वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार डॉ. सौ. ऋतुजा चव्हाण यांना उत्स्फूर्त प्रतिसाद देत विजयाचे आशीर्वाद देत आम्ही तुमच्यासोबत असल्याची ग्वाही दिली. गावागावात या प्रचार दौर्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मतदारांकडून मिळाला. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार डॉ.सौ.ऋतुजा ऋषांक चव्हाण यांनी मतदारसंघातील विकासासाठी आपण कटिबद्ध असल्याचे सांगून मतदारसंघातील प्राथमिक सुविधांपासून ते युवकांना रोजगार मिळवून देण्यासाठी सर्व तो प्रयत्न केल्या जाईल, गावातील पाणी, रस्ते, वीज, सिंचन आदी समस्या सोडवण्यास प्रथम प्राधान्य राहील असे आश्र्वासन मतदारांना दिले. तर मतदारांनी हे एक उच्च विद्याविभूषित व्यक्तिमत्व असलेल्या डॉ. ऋतुजा चव्हाण यांना उत्स्फूर्त पाठिंबा दिला. वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवाराला मिळत असलेला पाठिंब्यामुळे विरोधकांच्या तंबूत घबराट पसरल्याची चर्चा मेहकर लोणार विधानसभा मतदार संघात सुरु झाली आहे.

निवडणुकीत ज्या मतदारसंघातून तिकीट द्याल, तेथून पक्षाची सेवा अत्यंत प्रामाणिकपणे करीन...!



## मुलांनो मैदानात या...

आजचे युग हे विज्ञान तंत्रज्ञानाचे युग समजले जाते. २१ व्या शतकातील या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात स्मार्ट फोन, इंटरनेट हे प्रत्येकाच्या जीवनातील अविभाज्य घटक बनले आहेत. केवळ घरातील मोठ्या माणसंकडेच नव्हे तर शाळकरी मुलांकडे देखील मोबाईल फोन पाहायला मिळत आहे. कोरोना काळात ऑनलाइन शिक्षणासाठी पालकांनी घेऊन दिलेला मोबाईल अजूनही मुलांच्या हातात आहे. हाच मोबाईल आज मुलांचा सर्वात जवळचा सहकारी बनला आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत मुले मोबाईललाच चिकटून बसलेली असतात. आजच्या विज्ञान तंत्रज्ञान युगात मोबाईल हा गरजेचा आहे. तो गरजेपुरातच वापरला गेला पाहिजे मात्र आज मुलांसाठी मोबाईल हेच सर्वस्व होऊन बसले आहे. आजच्या मुलांना मोबाईलने भुरळ घातली आहे. दिवसातील पाच ते दहा तास मुले मोबाईल वरच असल्याने मुलांची शारीरिक व बौद्धिक वाढ खुंटत चालली आहे त्यामुळे मुलांचे बालपण हरवत चालले की काय अशी शंका मनात येते. आजची मुले जास्त प्रमाणात टीव्ही, संगणक, मोबाईल, इंटरनेट, व्हिडीओ गेम, व्हाट्सएप, फेसबुक, इंस्टाग्राम यासारख्या सोशल मीडियात दंग असतात. तंत्रज्ञानरुपी राक्षसानं मुलांचं बालपणच खाऊन टाकलंय. पूर्वी शाळांना सुट्ट्या लागल्या की गावागावातील मैदाने मुलांनी भरून गेलेली असायची पण आज ती मैदाने विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात ओस पडली असल्याचे चित्र पाहायला मिळते. क्रिकेट वगळता एकही मैदानी खेळ खेळताना मुले दिसत नाहीत. देशी खेळ तर आजच्या मुलांना माहीतच नाहीत. गोट्या भोवरे विटीदांडू खेळताना कोणी दिसत नाही. आट्यापाट्या आणि सुरपारंब्या या खेळाचे नियम तर सोडाच पण नावही आजच्या मुलांना माहीत नाही. मोठे रिंगण घेऊन त्यात गोट्यांचा डाव लावल्याचे चित्र आज पाहायला मिळत नाही. गलगुट करून खेळणे व त्यावर राज्य द्यावे लागल्याचे हल्लीच्या मुलांमध्ये ऐकिवातही नाही. भोवऱ्याच्या रिंगणाचीही तीच अवस्था. दगडावर आरी घासून भोवऱ्याला टोक करीत बसलेला मुलगा शोधूनही सापडेनासा झाला आहे. जुन्या कपड्यांचा चेंडू तयार करून खेळला जाणारा रप्पाधप्पीचा खेळ हल्लीच्या मुलांना माहीतही नाही. लपंडाव, विटीदांडू,, लगोरी, कुरघोडी, चंपूल, उडाणटप्पू हे खेळ आता दुर्मिळ झाले आहेत. लंगडी हा खेळ आता फक्त शाळेतील पिटी च्या तासापूरता उरला आहे. या खेळांमुळे मुलांचा शारीरिक व्यायाम व्हायचा शिवाय संघभावना, एकी, आपुलकी, नेतृत्व हे गुण या खेळांमुळे मुलांमध्ये विकसित व्हायचे. या खेळाची जागा आता टीव्ही, संगणक, मोबाईल व्हिडीओ गेम यांनी घेतली आहे. टीव्ही, संगणक, व्हिडीओ गेममुळे मुलांना विविध खेळांची माहिती उपलब्ध होऊन त्यातून मुलांचा बौद्धिक विकास होतो असे वाटत असले तरी त्यांचा शारीरिक विकास खुंटत चालला आहे याचा समाजातील सर्व घटकांनी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. मुलांना पुन्हा मैदानाकडे आणण्याची जबाबदारी पालक, शिक्षक व समाजातील सर्वच घटकांची आहे.

# २५ लाख रोजगार निर्मितीसह शेतकऱ्यांची कर्जमाफी

## केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांचे प्रतिपादन

दैनिक आपला विदर्भ




**मेहकर/प्रतिनिधी :** शिवसेना, भाजप ,राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे बहुमताचे सरकार सत्तेत येतात २५ लाख रोजगार निर्मितीसह शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी दिली जाईल. लाडकी बहीण योजनेच्या रकमेत वाढ करण्यात येणार हे आमचे अभिवचन आहे. असे प्रतिपादन केंद्रीय आयुष आरोग्य कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले.

विधानसभा निवडणुकीनिमित्त महायुतीच्या वतीने तयार करण्यात आलेले वचननाम्याचे प्रकाशन दि.९ नोव्हेंबर रोजी मेहकर येथे केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्याहस्ते करण्यात आले. या निमित्त आयोजित पत्रकार परिषदेत जाधव बोलत होते. पत्रकार परिषदेला शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख राजेंद्र गाडेकर, तालुका प्रमुख सुरेशतात्या वाळूकर, शहर प्रमुख जयचंद बाठीया, भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी अड्. शिव ठाकरे, प्रल्हाद अण्णा लष्कर, ठोकळ महाराज, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस गिरधर पाटील व अन्य पदाधिकाऱ्यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी महायुतीच्या वचननाम्याबाबत माहिती देताना ना. प्रतापराव जाधव पुढे म्हणाले की, सर्व घटकांसाठी उपयोगी ठरणारे निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात महायुती सरकारने घेतले आहेत.विरोधी पक्षांनी पूर्वी चुकीचा अपप्रचार केला होता. संविधान बदलले जाईल इत्यादी नकारात्मक गोष्टी मांडल्या होत्या. परंतु महायुती सरकारने आपल्या कृतीतून त्या सर्व गोष्टी फोल होत्या, हे दाखवून दिले आहे.पिकविमा,अतिवृष्टीमुळे, गारपिटीमुळे नुकसान भरपाई, पंतप्रधान व मुख्यमंत्री किसान योजना या माध्यमातून शेतकऱ्यांच्या बँक खात्यात मोठ्या रकमा आलेल्या आहेत. लाडकी बहीण योजनेमुळे ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला चालना मिळालेली आहे. लाडक्या बहिणींना महायुती सरकार बहुमताने विजय करून दिल्यास प्रतिमाह २१०० रुपये देण्यात येणार आहेत.तर शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करण्यात येऊन शेतकरी सन्मान योजनेतून वर्षाला १५ हजार रुपये देण्यात येणार आहेत. प्रत्येकास अन्न आणि निवारा निर्माण केला जाईल. वृद्ध पेन्शन धारकांना २१०० रुपये दर महिन्याला देण्याचे आमचे वचन आहे. जीवनावश्यक वस्तूंच्या किमती स्थिर ठेवल्या जातील. २५ लाख युवकांना दरमहा दहा हजार रुपये विद्या वेतन देण्याचे अभिवचन महायुती देत आहे. ४५ हजार गावांमध्ये शेत रस्ते व पांदण रस्त्याची निर्मिती करण्यात येणार आहे .अंगणवाडी आणि आशा सेविकांना पंधरा हजार रुपये आणि विम्याचे संरक्षण देण्याचा निर्णय आम्ही घेतलेला आहे. वीज बिलात ३० टक्के कपात करून सौर आणि अक्षय उर्जेवर भर देण्याचे आम्ही जाहीर वचन दिलेले आहे.सरकार स्थापनेनंतर व्हिजन महाराष्ट्र २०२९ हे स्वप्न साकार केले जाणार आहे, असेही प्रतापराव जाधव म्हणाले.मेहकर लोणार तालुक्यातील ६४ हजार शेतकऱ्यांची पिक विम्याची रक्कम सरसकट यापूर्वीच मंजूर करण्यात आलेली आहे. काही शेतकऱ्यांना ते मिळालेली आहे. राहिलेल्या सर्वांना टप्प्याटप्प्याने शेतकऱ्यांना मिळणार आहे, अशी माहिती ही जाधव यांनी दिली. उद्योग गुजरातला पळवल्याचा आरोप खोटा असून ५२ टक्के विदेशी गुंतवणूक महाराष्ट्र राज्यामध्ये आहे, अशी माहिती देऊन ते म्हणाले की, उद्योग क्षेत्रात राज्याने भरारी घेतलेली आहे. लाडकी बहीण योजनेला विरोध करणाऱ्या काँग्रेसने आता जाहीरनाम्यातच महिलांसाठी योजना देण्याचे आश्र्वासन दिले आहे, हा त्यांचा खोटारडेपणा आहे. धडाकेबाज निर्णय व त्याची त्वरित अंमलबजावणी ही महायुती सरकारची प्रमुख वैशिष्ट्ये असून भविष्यकाळातही यापेक्षाही दमदार कामगिरी करण्यात येईल. सरकारने सोयाबीन साठी हमीभाव ठरवून दिलेला आहे.त्याप्रमाणे आता शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल चार हजार नऊशे रुपये मिळतील, असेही जाधव म्हणाले. विरोधकांच्या कुठल्याही भुलथापांना बळी न पडता महायुतीच्या उमेदवारांना प्रचंड बहुमताने निवडून द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले. पत्रकार परिषदेत महायुतीच्या वचननाम्याचे प्रकाशन प्रतापराव जाधव व भाजप राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आले.

# मातृत्व मिळताना घ्यावयाची काळजी

कोणत्याही स्त्रीच्या आयुष्यामध्ये मातृत्व प्राप्त होणे ही एक अनोखी घटना असते. परंतु माता होताना स्त्रियांनी काही पथ्ये पाळण्याची गरज असते. कारण तिला माता झाल्यानंतर काही जबाबदार्?या येऊन पडत असतात. जर ती माता सतत आजारी पडत असेल तर ती त्या जबाबदार्?या कशा पार पाडू शकेल? बर्?याच महिला आपल्या आरोग्याच्या बाबतीत म्हणाव्या तेवढ्या दक्ष नसतात. त्यांना आपल्या प्रकृतीची हेळसांड परवडणारे नाही. म्हणूनच माता झालेल्या आणि होणार्?या स्त्रियांनी खालील पथ्ये पाळली पाहिजेत.



१) आरोग्यदायी आहार – मातेला केवळ स्वत:चेच नाही तर आपल्या कुटुंबाचेही आरोग्य चांगले राहील याबाबत काळजी घ्यावी लागते. या आहारामध्ये फळे आणि भाजीपाला यांचा मोठा समावेश असला पाहिजे. मुलांचा आहार सुद्धा फळांनी युक्त असला पाहिजे, पण स्वत: मातेलाही फळांचा आहार केला पाहिजे.

२) चालते-हलते रहा – निरोगी आयुष्य जगण्यासाठी मातेला सतत हलते-चालते राहिले पाहिजे. कष्टाची कामे केली पाहिजेत. एका जागी बसून रहाता कामा नये. अन्यथा तिच्या शरीरावर चरबी वाढत जाते. त्यातूनच रक्तदाब आणि मधूमेह असे विकार जडतात. ३) मातेला चांगली झोप मिळण्याची गरज असते. अन्यथा हृदयाचे विकार जडण्याची शक्यता असते. कोणत्याही प्रौढ व्यक्तीने किमान ७ ते ८ तास झोप घेतली पाहिजे.

४) तणावाचे व्यवस्थापन – लहान-मोठा ताण-तणाव हा आयुष्यातला अपरिहार्य भाग असतो. तो टाळता येत नाही. परंतु जेव्हा तणाव गंभीर स्वरूपाचा असतो तेव्हा त्याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. त्याचे व्यवस्थापन केले पाहिजे, तो टाळला पाहिजे. ५) सर्वात महत्वाचे म्हणजे प्रकृतीच्या बाबतीत कसलीही जोखीम घेता कामा नये. वारंवार तपासण्या केल्या पाहिजेत आणि आपल्या पूर्वजांचा आरोग्याच्या बाबतीतील इतिहास आपल्याला माहीत पाहिजे.

# देशी-विदेशी झाडे : संशयकल्लोळ आणि निरसन

सध्या विदेशी झाडे लावावी की देशी प्रजातीची झाडे यावर वाद सुरु असतात. काही देशी झाडांची बाजू घेतात तर काही विदेशी प्रजातीच्या झाडांची. मात्र या वादाकडे पर्यावरणपूरक की पर्यावरण घातक यादृष्टीकोनातून पाहायला हवे. पर्यावरण दिनानिमित्त प्रा. डॉ. निनाद शहा

विविध देशात तेथील पोषक हवामान, अधिवास यानुसार विशिष्ट वनस्पती वाढत असतात. या वनस्पती आणि त्यावर अवलंबून असणारे वन्यजीव यांनी मिळून समृद्ध पर्यावरण निर्मिती होत असते. या पर्यावरणात परिसंस्थेच्या बाहेरच्या वनस्पती आल्या तर काय होते, हा सध्याच्या चर्चेचा विषय आहे. खरे तर विदेशी विरुद्ध देशी झाड, असा माझ्या दृष्टीने वाद नाही. तो पर्यावरणघातक विरुद्ध पर्यावरणपूरक, असा असावा. अनेक झुडुपे, वेली, झाडे भारतात रुजलेली आहेत, उपयोगी आहेत, असे काही जणांचे म्हणणे आहे. पण इथे लक्षात घेतले पाहिजे की या सर्व विदेशी वनस्पती (उदा. पेरु, सफरचंद, सीताफळ, द्राक्षे, ऊस, मिरची, बीट) शेती व्यवसायांतर्गत येतात. येथे त्यावर नियंत्रण असते, त्यांची काळजीपूर्वक निगा राखली जाते. या वनस्पती आक्रमकही नसतात.



आपल्या पर्यावरणीय वातावरणाला घातक वृक्षारोपणाला विरोध आहे. इथे विदेशी झाडप्रेमी म्हणतात की देशी झाडाप्रमाणे विदेशी झाडे सावली देतात, प्राणवायूची निर्मिती करताहेत आणि दिसायलाही रंगीबेरंगी फुलांमुळे सुंदर दिसतात. मग विरोध का? एक विदेशी झाड दहा स्थानिक झाडांना वाढू देत नसेल तर दहापट प्राणवायू निर्मिती आणि सावली कमी होते. हा तोटा आहे. आपल्या देशात विदेशी झाडांचे कीड आदी शत्रू नसल्याने त्यांना मोकळे रान मिळते. त्यामुळे ते देशी झाडांना वाढू देत नाहीत.

विदेशी झाडांमुळे आपली जैविक विविधता कमी होऊ लागली आहे. अशा तऱ्हेने देशी प्रजातीय विविधता कमी करून हे जीवशास्त्रीय प्रदूषण करतात. या विदेशी झाडांची पाने प्राणी अजिबात खात नाहीत. या झाडांवर काही पक्षी व किटक अधिवास करीत नाहीत. ही विदेशी झाडे ठिसूळ असतात. त्यांचे आयुष्यमान कमी असते. त्यांची पाने लवकर कुजत नाहीत आणि खतही तयार होत नाही. त्यामुळे जमिनीचे प्रदूषण होते. वादळात पहिल्यांदा ही झाडे उन्मळून पडतात आणि वाहतूक कोंडी करतात. काही विदेशी झाडे फुलसंभाराम ुळे सुंदर दिसतात. उदाहरणार्थ गुलमोहर, नीलमोहर, पीत मोहोर, स्पॅथोडिया इत्यादी. पण दृष्टीसुख सोडले तर पर्यावरणीय मूल्य शून्यच आहे. अपवाद म्हणायला एखाद्या झाडावर दोन चार पक्षी बसतात पण तेथे राहत नाहीत. तसेच पर्याय कमी होत असल्याने कुठेकुठे मधमाशा गुलमोहरासारख्या एखाद्या झाडावर प्रसंगी दिसू शकतात.

कर्नाटक राज्य शासनाने निलगिरी झाडाची लागवड करण्यास बंदी घातलेली आहे. निलगिरीचे झाड जमिनीतील पाणी मोठ्या प्रमाणावर (जवळजवळ ९० लिटर दिवस) शोषून घेते. त्यामुळे हे झाड पाणी दुर्भिक्ष असलेल्या ठिकाणी लावून चालत नाही. पन्नास वर्षापूर्वी सोलापुरातील पंढरपूर, सांगोला भागातील माळरान जमिनीवर मेक्सिको येथील वेडी बाभूळ लावली. ती वेगाने वाढली आणि देशी बाभळीला तिने जवळजवळ नष्टच केले.

आपल्याकडेही कमी कालावधीत वाढणारी देशी झाडे आहेत. उदाहरणार्थ काटेसावर, कांचन, शिरीष, हादगा, शेवगा, कदंब, सीतेचा अशोक, सुरंगी. याशिवाय वड, पिंपळ, कडुलिंब, चिंच, उंबर झाडे तर सदासर्वकाळ उत्कृष्ट होत, अशी देशी झाडे लावावीत.

माळरानावर झाडे लावणे

सर्वसामान्य समज असा की गवताळ व त्यावर विखुरलेली थोडीशीच झाडे, अशा परिसंस्थेपेक्षा भरपूर झाडे असलेल्या प्रदेशाचे महत्त्व अधिक आहे. आजची पर्यावरण चळवळ मुख्यत्वे यावरच अवलंबून आहे. परंतु दिसेल त्याठिकाणी वृक्षारोपण करणे योग्य नाही. शिवाय कोणतीही झाडे कुठेही लावणे चुकीचे असते. जमिनीचा प्रकार, पोत, हवामान पाहूनच झाडे लावावी लागतात. झाडे माळावर लावताना बऱ्यापैकी म्हणजे साधारण वीस मीटर अंतर ठेवावे लागते. झाडं लावायची असतील तर ती म ेडशिंगी, बारतोंडी, काळा शिरीष इत्यादी लावावी. महत्त्वाचे म्हणजे ही सर्व झाडे हळूहळू वाढत असतात आणि आपल्याला तर भरकन परिसर हिरवागार झालेला पाहायचा असतो. त्यामुळे संयम हवा. प्रत्येक परिसंस्थेचे जैविक वैशिष्ट्यांमुळे जीवशास्त्रीय स्वरूप ठरलेले असते. माळराने (गवताळ परिसंस्था) वर्षभर हिरवीगार राहूच शकत नाहीत. आपण अट्टाहासाने जर माळावर सदाहरित वृक्षारोपण करु लागलो तर तेथील जैविक विविधतेवर निश्चितच परिणाम होतो. ती हळूहळू कमी होत जाणार हे नक्की. माळढोक पक्ष्याचे उदाहरण आपल्यासम ोर आहे. माळरानावर केलेले ग्लिरिसिडियाचे वृक्षारोपण माळढोकचे तेथून जाण्याच्या अनेक कारणांपैकी एक प्रमुख मानले जाते. आता माळढोकच्या वाटेवर येथील धाविक, पखुर्डी, माळटिटवी याबरोबरच इतर प्राणीही कमी होऊ लागलेले आहेत. दुष्काळग्रस्त भागात जीवसृष्टी टिकून राहावी म्हणून माळरान परिसंस्था अस्तित्वात आलेली आहे, ती तशीच आपणाला जपली पाहिजे.

# लिव्हरसाठी घरगुती उपाय गुणकारी

सर्व जण आपापल्या शरीरासाठी वेगवेगळ्या डॉक्टरांकडून टिप्स घेत असतात. त्यांनी दिलेल्या सल्ल्यानुसार आपली दिनचर्या ठेवतात. मात्र इतके सर्व उपाय करण्याऐवजी तुम्ही घरगुती उपाय करूनसुद्धा तुमच्या लिव्हरची नीट काळजी घेऊ शकता.स्मोकिंग, अल्कोहोल, तणाव व जंकफूड या गोष्टीमुळे लिव्हरवर ताण पडतो. यामुळे अनेकांना लिव्हरच्या संदर्भातील आजार उद्भवतात. त्यापासून मुक्तता मिळवायची असेल तर जेवणात नियमित हळदीचा वापर करावा. रात्रीच्या वेळी झोपताना चिमूटभर हळद दुधामध्ये टाकून दूध प्यावे. त्यामुळे तुमचे लिव्हर चांगले राहते व तुम्हाला कफ, खोकला या रोगांपासून मुक्तता मिळेल.१.आवळयामध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते तसेच पोटासाठी आवळा फायदेशीर आहे. कारण या आवळ्यामध्ये लिव्हरचे रक्षण करण्याचे गुण असतात.२.जे लोक अल्कोहोलिक फॅटी लिव्हर रोगामुळे त्रस्त आहेत. त्यांच्या लिव्हरमध्ये ट्रान्सएमानेज एन्झाइम्सचे प्रमाण वाढते. ज्येष्ठमधातील तत्त्व या एन्झाइमचे प्रमाण लिव्हरमधून कमी करण्यात सक्षम आहेत. त्यामुळे ज्येष्ठमध लिव्हरसाठी लाभकारी ठरते.३.जुने लोक आपल्या तुळशीच्या रोपांसोबत गुळवेलीचेही रोप लावत, कारण गुळवेल ही तुळशीप्रमाणे आपले शरीर निरोगी ठेवण्यास मदत करते. म्हणून जुने लोक गुळवेलीची ४-५ पाने दररोज चावून चावून खात.४.जवसाच्या बियांमध्ये साइटोकॉन्स-टीट्यूएंट्स आढळून येते. त्यामुळे हार्मोन्सला एकत्रित होण्यापासून रोखले जाते. यामुळे लिव्हरवर कमी दाब पडतो.५.बीट, कोबी, गाजर, ब्रोकली, कांदा, लसूण, आदी भाज्या लिव्हरसाठी फायदेशीर असतात

## वाचनाने बुद्धीमत्ता वाढते

आपल्या समाजात सध्या मुलांच्या करीयरवर पालकांची मोठी नजर असते. त्याला शालेय शिक्षणातून पिळून काढून जास्तीत जास्त मार्क मिळवण्यासाठी उद्युक्त करण्यावर पालकांचा भर असतो. पण ते करताना ही पालक मंडळी त्याने अभ्यासाशिवाय अन्य काहीही वाचू नये याबाबत दक्ष असतात. त्याच्या हातात एखादे गोष्टीचे पुस्तक दिसले की ते हिसकावून घेतात आणि असे फालतू वाचन करण्यात वेळ घालवण्यापेक्षा तेवढाच वेळ शाळेचा अभ्यास केला तर चार दोन मार्क जास्त पडतील असा उपदेशही करतात.

खरे तर असे फालतू वाचन हे फालतू नसते. जी मुले अवांतर वाचन जास्त करतात त्यांचाच अभ्यास पक्का असतो असा अनुभव आहे. कारण शाळेच्या पुस्तकाबाहेरचे काही काही वाचून त्याच्या मनात काही नवे शब्द आणि संकल्पना रुजतात आणि त्यामुळे त्याला कोणतीही नवी संकल्पना लवकर अवगत होते. ब्रिटनमधील एडिनबरो येथील मानसशास्त्रज्ञ स्टुअर्ट रिची यांनी हे संशोधन केले आहे.

आपल्या मुलाचा अभ्यास पक्का करायचा असेल तर तो शाळेतली पुस्तके वाचतो की नाही हे तर पहाच पण तो त्याशिवाय अन्य काही वाचत आहे की नाही यावरही लक्ष ठेवा असा सल्ला त्यांनी पालकांना दिला आहे. किंबहुना मुलाची वाचनाची क्षमता आणि त्याला किती लहान वयात वाचायला येत आहे यावर त्याची प्रगती ठरते असे म्हटले आहे. तेव्हा आता मुलाच्या हातात गोष्टीचे पुस्तक दिसले की ते हिसकावून घेऊ नका. त्यामुळेच त्याचा अभ्यास पक्का होणार आहे.

## फ्रूट ज्यूसही आरोग्याला हानीकारकच

फळांचा रस आरोग्यदायी असतो असा आपला ठाम समज आहे. मात्र आपल्या या समजाला धक्का देणारी बाब संशोधनातून नुकतीच समोर आली आहे. संशोधकांचे असे म्हणणे आहे की एक ग्लास कोलासारखे शीतपेय शरीराला जितके अपायकारक आहे, तितकाच १ ग्लास फ्रूट ज्यूसही आहे.

संशोधक याबाबतचे स्पष्टीकरण देताना सांगतात, आख्खे फळ खाण्याऐजवी जर त्याचा रस काढला गेला तर त्यात फायबर रहात नाहीच पण ताज्या रसाला चव आणण्यासाठी वरून साखर घालावी लागते. म्हणजेच प्रत्यक्ष फळापेक्षा रसात साखरेचे प्रमाण जास्त होते. रस काढल्यामुळे फळांतील जीवनसत्त्वे कमी होतात. टेट्रा पॅक मधील फळाचा रस पॅक करण्यापूर्वी वर्षभर काढलेला आणि मोठ्या कंटेनरमध्ये ऑक्सिजन शिरू न देता साठविलेला असतो. या प्रोसेसमध्ये फळाचा खरा स्वाद नष्ट होतो व त्यामुळे रसाला चव आणण्यासाठी कृत्रिम फ्लेवर्स वापरले जातात.

फळांच्या रसांना आकर्षक रंग आणण्यासाठी व गोडी वाढविण्यासाठी वापरले जाणारे रंग व स्वीटनरमुळे रसाची पोषणमूल्ये कमी होतात. त्यापेक्षा आख्खे फळ अधिक पोषणमूल्ये देते. याचा अर्थ असाही आहे की कोणत्याही शीतपेयांपेक्षा अथवा फ्रूट ज्यूसपेक्षा साधे पाणीच अधिक आरोग्यदायी आहे. पण साधे पाणी पिणे फारसे आवडत नसेल तर?

तर त्यावरचा एक उपायही संशोधकांनी सुचविला आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे एका बाटलीत लिंबू वर्गातील कोणतेही म्हणजे संत्रे, मुसुंबे असे फळ अर्धे कापून बाटलीच्या तळात बसवा आणि वरून साधे शुद्ध पाणी ओता. हे तयार झालेले पेय फ्रूट वॉटर

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### स्कूटीवरून दोघेजण गेले, परत मात्र एकटाच आला; पनवेलमधील वावंजे येथील घटना



दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी** : पनवेल मधील वावंजे येथे राहणाऱ्या ६० वर्षीय याकूब खान अचानक बेपत्ता झाल्याने नातेवाईकांनी पनवेल पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. सीसीटीव्ही आणि यांत्रिक मदतीने याकूब खानचा शोध सुरू केला असताना, घटनेच्या दिवशी त्याच्या सोबत एक अनोळखी व्यक्ती एका ठिकाणी बोलताना दिसून आला, त्याचवेळी ती व्यक्ती याकूब खानच्या स्कुटीवरून जाताना दिसून आली, मात्र येताना मागे बसलेली अनोळखी व्यक्ती एकटीच परत आल्याचे दिसून आले.पोलिसांनी त्याला उत्तर प्रदेश मधून ताब्यात घेतले असता, तपासात आपल्या पत्नी आणि वडिलांना याकूब खान याने वारंवार अपशब्द वापरल्याने त्याला मारून टाकल्याची कबुली त्यांनी दिली. पोलिसांनी त्याला अटक केली असून,पुढील कारवाई सुरू आहे

### तिकडे डोनाल्ड ट्रम्प जिंकले, इकडे जळगावात सोने दोन हजारांनी स्वस्त, तोळ्याचा भाव किती?

**जळगाव/प्रतिनिधी** : अमेरिकोमधील राष्ट्राध्यक्षपदाचा निकाल लागल्यानंतर अमेरिकन फेडरल बँकेच्या व्याज दरात बदल झाला आहे. याचा परिणाम म्हणजे, त्यानंतर सोन्याच्या दरांत अंदाजे पंधराशे रुपयांची घसरण झाली आहे. ट्रम्प इफेक्ट म्हणून ही घसरण मानली जात आहे.

अमेरिकेत राष्ट्रध्यक्ष निवडीत डोनाल्ड ट्रम्प विजयी झाल्यानंतर जागतिक पातळीवर झालेल्या आर्थिक घडामोडीचा परिणाम जळगावच्या सुवर्ण नगरीमध्येही पाहायला मिळाला आहे. सोन्याच्या दरांत दोन दिवसांत दोन हजार रुपयांची घसरण झाल्याचं पाहायला मिळत आहे.

अमेरिकेनं राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी निवडणुकीपूर्वी घोषणा केली होती की, आपण विजयी झाल्यावर युद्ध शमविण्याचा प्रयत्न करणार आहोत, त्यांच्या या घोषणेनंतर त्यांचा विजय झाला असल्यानं, जागतिक पातळीवर युद्धजन्य परिस्थिती निवळेल, अशी आशा गुंतवणूक दारात निर्माण झाल्यानं, सुरक्षित गुंतवणूक म्हणून सोन्याकडे वळलेले ग्राहक पुन्हा अन्य ठिकाणी गुंतवणुकीकडे वळू लागले आहेत. त्यांचा परिणाम म्हणूनच सोन्याच्या मागणीत मोठी घट झाली आणि सोन्याच्या दरांत घसरण झाल्याचं पाहायला मिळत आहे, असा दावा सोनं व्यावसायिकांनी केला आहे. सोन्याच्या दरांत झालेली ही घसरण मात्र ग्राहकांना दिलासा देणारी ठरली आहे

गेल्या काही दिवसांपासून सोन्या-चांदीच्या दरात वाढ होताना दिसत आहे. दिवाळीनंतर किंचित नरमाई आली असली तरी भाव अजूनही चढेच आहेत. २४ कॅरेट सोन्याचा भाव ८०,००० रुपयांच्या खाली आला आहे, तर चांदीचा भावही १,००,००० रुपयांच्या खाली गेला आहे. आज, शनिवारी, ९ नोव्हेंबर रोजी २२ कॅरेट सोन्याचा भाव ७२,००० रुपयांवरून ७२,८५० रुपये प्रति १० ग्रॅम आणि २४ कॅरेट सोन्याचा भाव ७८,५६० रुपयांवरून ७९,४७० रुपये प्रति १० ग्रॅम झाला आहे. त्याचवेळी चांदीचा भाव ९३,००० रुपयांऐवजी ९४,००० रुपये प्रति किलोवर पोहोचला आहे.

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पोहोचले प्रकाश आंबेडकरांच्या भेटीला, नेमकं कारण काय?

**पुणे/प्रतिनिधी** : विधानसभा निवडणुकीच्या धामधुमीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांची पुण्यातील त्यांच्या निवासस्थानी जाऊन सदिच्छा भेट घेतलीय. यावेळी मुख्यमंत्र्यांनी प्रकाश आंबेडकर यांच्या तब्येतीची विचारपूस करून त्यांना लवकरात लवकर बरं होऊन जनसेवेत रुजू होण्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसंच ''इथं जवळच सभा होती आणि प्रकाश आंबेडकरांचं नुकतच ऑपरेशन झालं होतं म्हणून भेटायला आलो होतो. याचा कुठलाही राजकीय अर्थ काढू नका,'' असंही मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी स्पष्ट केलं आहे.


प्रकाश आंबेडकरांच्या भेटीनंतर मुख्यमंत्री शिंदेंची प्रतिक्रिया : यावेळी प्रसार माध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, ''प्रत्येक भेटीकडं राजकीय दृष्टीनं बघू नका. तसंच राजकीय अर्थ देखील काढू नका. प्रकाश आंबेडकर हे माझे चांगले मित्र असून त्यांची काही दिवसांपूर्वीच अँजीओप्लास्टी झाली. माझी बाजुलाच सभा असल्यामुळं मी त्यांना भेटलो आणि ही भेट आमची सदिच्छा भेट होती. यात राजकीय काहीही नव्हतं.''

उपमुख्यमंत्र्यांनीही घेतली भेट : उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही नुकतीच प्रकाश आंबेडकर यांची भेट घेत त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली. या भेटीनंतर प्रसार माध्यमांशी संवाद साधत असताना अजित पवार म्हणाले की, ''प्रकाश आंबेडकर यांची काही दिवसांपूर्वी शस्त्रक्रिया झाली आहे. त्यांच्या तब्येतीबाबत विचारपूस करण्यासाठी आलो होतो. आमच्या दोघांमध्ये जवळपास एक तास चांगल्या प्रकारे चर्चा झाली. प्रकाश आंबेडकर यांची तब्येत चांगली असून ते लवकरच राज्यात प्रचारासाठी बाहेर पडणार आहेत,'' असं अजित पवारांनी सांगितलं. प्रकाश आंबेडकर यांना ३१ ऑक्टोबर रोजी छातीत दुखू लागल्यानं पुण्यातील एका रुग्णालयात दाखल करण्यात आलं.

# जगप्रसिद्ध सारंगी वादक पंडित राम नारायण यांचं निधन; शासकीय इतमामात होणार अंत्यसंस्कार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या सारंगी वादनानं लाखो रसिकांना मंत्रमुग्ध करणारे पद्मविभूषण पंडित राम नारायण यांचं शुक्रवारी (८ नोव्हेंबर) रात्री मुंबईत निधन झालं. वयाच्या ९६ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. राम नारायण यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्याच्या सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या आहेत. त्यांच्या निधनानं संगीत क्षेत्रातील एका महान कलाकारास आपण मुकलो आहोत, अशी भावना मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली आहे.





मूळचे राजस्थानच्या उदयपूरमधील राम नारायण हे ५० च्या दशकात मुंबईत आले आणि एकल सारंगी वादक म्हणून त्यांनी मोठी लोकप्रियता मिळवली. त्यांनी सारंगी वादनाच्या विविध शैली विकसित करून जागतिक स्तरावर कीर्ती मिळवली. संगीत क्षेत्रातील नवनव्या कलाकारांना पंडित राम नारायण यांचं कार्य नेहमीच प्रेरणा देणारं ठरेल, असं मत मुख्यमंत्र्यांनी आपल्या शोक संदेशात व्यक्त केलं आहे.

### पंडित राम नारायण यांच्या सारंगीचे स्वर हृदयस्पर्शी होते: राज्यपाल राधाकृष्णन

**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी जगविख्यात सारंगीवादक पद्मविभूषण पंडित राम नारायण यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केले आहे. पंडित राम नारायण यांनी आपल्या अद्भुत वादनातून सारंगी हे वाद्य आंतरराष्ट्रीय स्तरावर नेले. त्यांच्या सारंगीचे स्वर हृदयस्पर्शी व स्वर्गीय आनंद देणारे होते. पंडित राम नारायण यांनी देश विदेशात अनेक उत्तमोत्तम शिष्य घडवले व आपले ज्ञान मुक्तहस्ताने वाटले. त्यांचे दैवी संगीत त्यांच्या पश्चात देखील शतकानुशतके कायम राहील. त्यांच्या निधनामुळे सारंगीतील एक पर्व संपले आहे. पंडित राम नारायण यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहतो व आपल्या शोकसंवेदना त्यांचे कुटुंबिय, शिष्यपरिवार व संगीत प्रेमींना कळवतो, असे राज्यपालांनी आपल्या संदेशात म्हटले आहे.

## राज ठाकरेंकडं फडणवीसांची स्क्रिप्ट; ईडीची टांगती तलवार असल्यानं त्यांना बोलावं लागते, संजय राऊतांचा हल्लाबोल

दैनिक आपला विदर्भ




**मुंबई/प्रतिनिधी** : ''राज ठाकरे यांच्याकडं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची स्क्रिप्ट आहे. ईडीची टांगती तलवार असल्यानं त्यांना बोलावं लागते,'' असा जोरदार हल्लाबोल उबाठा खासदार संजय राऊत यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेना प्रमुख राज ठाकरे यांच्यावर केला. ''विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये गुंडांच्या टोळ्या सक्रिय झाल्या आहेत. गुंड पोलिसांना आदेश देत आहेत. मात्र सरकार बदलणार हे पोलिसांनी लक्षात ठेवावं,'' असा दमही खासदार संजय राऊत यांनी पोलिसांना भरला. यावेळी खासदार संजय राऊत यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरही टीका केली.

राज ठाकरेंवर ईडीची टांगती तलवार : याप्रसंगी बोलताना संजय राऊत म्हणाले, की ''राज ठाकरे यांची स्क्रिप्ट ही देवेंद्र फडणवीस यांनी लिहिलेली आहे. त्याचप्रमाणं राज ठाकरे यांच्यावर ईडीची टांगती तलवार असल्यानं त्यांना हे सर्व बोलावं लागत आहे,'' असा आरोपही संजय राऊत यांनी केला. ''भाजपाच्या नादी लागलेला अजून काय बोलणार? राज ठाकरे जिथं बोलले तिथं गुंडांच्या माध्यमातून निवडणूक लढवली जात आहे, असा आरोप सुद्धा संजय राऊत यांनी केला आहे. ''गुंडांच्या मदतीनं सत्ताधारी पक्षाचे नेते निवडणुका लढवत असून प्रत्येक मतदारसंघासाठी स्वतंत्र गुंडांची नियुक्ती त्यांनी केली आहे. ज्या पद्धतीनं शिंदे आणि भाजपाचे लोक गुंडांचा वापर करुन निवडणुका लढवत आहेत, त्यानंतर जे घडेल त्याची सर्व जबाबदारी पोलिसांची असेल.''

पंतप्रधान मोदी - अमित शाहांमुळे आम्ही अनसेफ : ''एक रहेंगे तो सेफ रहेंगे'' या पंतप्रधान मोदी यांच्या नाऱ्यावर सुद्धा संजय राऊत यांनी टीका केली आहे. ''अशा प्रकारची भाषा बोलण्याची वेळ पंतप्रधानांवर का यावी? आम्ही महाराष्ट्रामध्ये नक्कीच सेफ असून मोदी - शाह आल्यानंतरच आम्ही अनसेफ होतो,'' अशी टीकाही राऊत यांनी केली आहे. ''शिवसेनेतील सहकारी, राष्ट्रवादीतले कार्यकर्ते, पदाधिकारी यांना पंतप्रधान मोदी यांनी वेगळं केलं. त्यासाठी आपण काय बोलत आहोत, ते अगोदर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांनी समजून घ्यायला हवं.''

एकनाथ शिंदे पुन्हा मुख्यमंत्री होणार नाहीत : संजय राऊत पुढं म्हणाले आहेत, की ''कुठल्याही परिस्थितीमध्ये एकनाथ शिंदे हे पुन्हा राज्याचे मुख्यमंत्री होणार नाहीत. त्यांचं अवतार कार्य आता भाजपा संपवणार आहे. याचा अर्थ देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होतील, असाही नाही. महाराष्ट्रात मुख्यमंत्री हा महाविकास आघाडीचाच होईल,'' अशा पद्धतीचा दावाही संजय राऊत यांनी केला आहे.

## गरोदरपणात 'ही' अभिनेत्री खातेय गोमूत्र आणि शेणापासून बनवलेले तूप, सांगितले फायदेही



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : प्यार का पंचनामा अभिनेत्री सोनाली सहगल लवकरच आई होणार आहे. काही काळापूर्वी तिने तिच्या प्रेग्नन्सीची घोषणा केली होती. ती आता गरोदरपणाच्या ९व्या महिन्यात आहे. अशा परिस्थितीत ती तिच्या खाण्यापिण्याची विशेष काळजी घेत आहे. तिने सोशल मीडियावर तिच्या खाण्याच्या सवयी आणि दैनंदिन दिनचर्याबद्दल सांगितले. दरम्यान जिथे तिने नवव्या महिन्यात गाईचे दूध, मूत्र आणि शेणापासून बनवलेले तूप खात असल्याचा खुलासा केला. त्याचे फायदेही तिने लिहिले आहेत.

सोशल मीडियावर शेअर करते दिनचर्या

सोनाली सहगल या अभिनेत्रीने तिच्या प्रेग्नेंसीबद्दल उघडपणे चर्चा केली आहे. ती सतत प्रेग्नसीमध्ये ती करत असलेल्या योगाचे फोटो आणि व्हिडीओ शेअर करत असते. सोशल मीडियावर प्रत्येक उपक्रमाबद्दल सांगताना ती दिसली आहे. दरम्यान, त्याने खाण्यापिण्याबाबतही तिने सांगितले आहे. तिने गाईचे दूध, मूत्र आणि शेणापासून बनवलेच्या तुपाचे फायदे सांगितले आहेत. सोनाली सहगलने इंस्टाग्राम स्टोरीजवर एक फोटो शेअर केला आहे. जिथे तिने तिच्या हातात तुपाचा ग्लास धरला आहे. ती पंचगव्य तूप खात आल्याचे ती सांगत आहेत. पंचगव्य म्हणजे गाईचे दूध, दही, तूप, गोमूत्र आणि शेण यांचे मिश्रण.

सोनाली सहगलने दिली अधिक माहिती

यासोबत सोनाली सहगलने लिहिले की, 'हे तूप टेस्टमध्ये चांगले लागत नाही. पण त्याचे अनेक फायदे आहेत. हे तूप गाईचे दूध, शेण, तूप आणि मूत्र यापासून बनवले जाते. यासोबतच पुढच्या पोस्टमध्ये तिने पंचगव्याचा अर्थ सांगितला आणि त्याचे फायदे सांगितले. याचे सेवन केल्याने मानसिक व शारीरिक शक्ती चांगली राहते. यामुळे हृदयाशी संबंधित आजारही दूर होतात.' असेही तिने सांगितले.

सोनाली सहगलची प्रेग्नसी घोषणा

सोनाली सहगलने १६ ऑगस्ट रोजी तिच्या प्रेग्नन्सीची घोषणा केली होती. एका अतिशय क्यूट पोस्टद्वारे तिने सांगितले होते की ती आई होणार आहे. सोनाली सहगलच्या पतीचे नाव आहे आशेष सजनानी या दोघांनी जून २०२३ मध्ये लग्न केले.

## महायुतीच्या नेत्यांना मी सर्व खर्च, गाड्या, स्पेशल चार्टर्ड देतो, येऊन आमच्या योजना बघाव्यात; पीएम मोदींच्या टीकेवर काँग्रेसच्या संकटमोचकांचे ओपन चॅलेंज

नवी दिल्ली : भाजपकडून खोटा प्रचार सुरू आहे, कर्नाटकमध्ये सरकारकडून जे वादे करण्यात आले ते पूर्ण केले नाहीत, असा खोटा प्रचार भाजपकडून सुरू आहे. मात्र, महायुतीच्या सर्व नेत्यांना मी आमंत्रित करतो, त्यांच्या येण्या जाण्याचा सर्व खर्च, गाड्या, स्पेशल चार्टर्ड आम्ही देतो. त्यांनी येऊन आमच्या योजना बघाव्यात अशा शब्दात कर्नाटकचे उपमुख्यमंत्री तथा काँग्रेसचे संकटमोचक डीके शिवकुमार यांनी पीएम मोदी यांनी केलेल्या टीकेवर घणाघाती प्रहार केला. आज काँग्रेसशासित राज्यांमधील मुख्यमंत्र्यांनी मुंबईमध्ये एकत्र येत मोदींकडून झालेल्या टीकेला प्रत्युत्तर दिले. मोदी यांनी महाराष्ट्रामधील पहिल्या सभेमध्ये बोलताना काँग्रेसची योजना फसव्या असल्याचे म्हणत जी योजना, आश्वासने दिली ती पूर्ण केली नाहीत अशी टीका केली होती. या टिकेचा समाचार घेत आज काँग्रेसच्या मुख्यमंत्र्यांनी मुंबईमध्ये पत्रकार परिषद घेतली आणि प्रत्युत्तर दिले.

महायुतीला आम्ही कर्नाटकमध्ये येण्यासाठी आमंत्रित करत आहोत

शिवकुमार यावेळी बोलताना म्हणाले की भाजपने आम्हाला संधी दिली त्याबद्दल त्यांचे आभारच मानायला हवेत. महायुतीला आम्ही कर्नाटकमध्ये येण्यासाठी आमंत्रित करत आहोत. आम्ही घोषणा केलेल्या सर्व योजना सुरू आहेत ते त्यांनी एकदा येऊन पाहावे. ते म्हणाले की, पंतप्रधानांच्या खोट्या गोष्टी समोर आणण्यासाठी मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री एकत्र आले आहेत. ही देशातील ऐतिहासिक पत्रकार परिषद आहे. दरम्यान, तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी सांगितले की पंतप्रधान यांनी खोटे बोलणं सोडलं सोडलेलं नाही तर आम्ही खरं बोलणं सोडणार नाही. तेलंगाणामध्ये आम्ही योजना राबविल्या आहेत, याची वस्तुस्थिती तुमच्यासमोर ठेवणं माझी जबाबदारी असल्याचे ते म्हणाले. मोदी यांनी शेतकऱ्यांवर काळा कायदा लादल्याच ते म्हणाले. मोदी अदानी आणि अंबानींसाठी काम करत आहेत. तेलंगणात १७००० कोटी रुपयांची कर्जमाफी केली. सोनिया गांधी यांनी तेलंगणा प्रदेश बनवण्याची गॅरंटी दिली होती.

ते म्हणाले की, दहा महिन्यांमध्ये आम्ही पन्नास हजार नोकऱ्या दिल्या. पाचशे रुपयांमध्ये सिलेंडर दिला. २०० युनिट मोफत देण्यात आली. महिलांसाठी मोफत प्रवास दिला. एकनाथ शिंदे आणि अजित पवार गुजरातचे गुलाम बनून काम करत आहेत, अशा शब्दात रेवंत रेड्डी यांनी दोघांवर तोफ डागली. दरम्यान हिमाचलचे मुख्यमंत्री हिमाचलचे मुख्यमंत्री सुखविंदर सुख्खू यांनी सुद्धा हल्लाबोल केला. ते म्हणाले की हिमाचलमध्ये ५००० रुपये मिळायचे, पण आमच्या जुन्या पेन्शनमुळे ५० हजार रुपये मिळू लागले आहेत. २७ वर्षापासून ५००० अनाथ मुलांना आम्ही पालकत्व दिलं आहे. हे देशातील एकमेव राज्य आहेत ज्या ठिकाणी गाईचे दूध ४५ आणि म्हशीच्या दुधाला ५५ रुपये किंमत निर्धारित केली आहे. १८ वर्षावरील मुलींना आम्ही पंधराशे रुपये देत आहोत. विधवा महिलांच्या मुलांचा शिक्षणाचा खर्च सरकारने उचलला आहे. महाराष्ट्रात निवडणूक आहे आणि हिमाचल प्रदेशची चर्चा होत आहे. आम्ही सत्ता सुख घेण्यासाठी नाही आलो, मनमोहन सिंग यांच्यानंतर राहुल गांधी यांना संधी होती असेही त्यांनी यावेळी सांगितले. आम्ही परिवर्तनासाठी आलो असल्याचे ते म्हणाले.

## योगा टीचरला विवस्त्र करत गळा दाबून पुरलं, पण श्वास रोखत मारेकऱ्याला अन् मृत्यूलाही चकवलं, खड्ड्यातून जिवंत बाहेर पडली अन् पोलिस स्टेशन गाठलं!

बैगळरू : महिला योगा टीचरला विवस्त्र करून तिचा गळा दाबून खून करण्याचा प्रयत्न केला, पण योगा टीचर असल्याने हल्लेखोराला आणि मृत्यूला चकवा देण्यात यशस्वी झाली. हे प्रकरण प्रेमप्रकरणातून असल्याची माहिती कर्नाटकमधील चिकबल्लापूर पोलिसांनी दिली. ही घटना २३ ऑक्टोबर रोजी चिकबल्लापूरपासून ३० किमी अंतरावर निर्जनस्थळी घडली होती. गाडलेल्या खड्ड्यातून बाहेर येत ३४ वर्षीय योग शिक्षकाने गावकऱ्यांकडे मदत मागितली. गावकऱ्यांकडून कपडे मागितल्यानंतर ती थेट पोलिस ठाण्यात गेली. तक्रार नोंदवल्यानंतर पोलिसांनी महिलेची वैद्यकीय तपासणी केली. याप्रकरणी आतापर्यंत ६ जणांना अटक करण्यात आली आहे.

काय आहे योग टीचरचे प्रकरण?

कर्नाटकातील चिकबल्लापूर येथे राहणाऱ्या बिंदू नावाच्या महिलेला तिच्या पतीचे योगा टीचरसोबत प्रेमसंबंध असल्याचा संशय होता. महिलेने तिचा मित्र सतीश रेड्डीला योगा टिचरवर लक्ष ठेवण्यास सांगितले. रेड्डी बेंगळुरूचा रहिवासी आहे. तो एक खासगी गुप्तहेर देखील आहे. रेड्डीने ३ महिन्यांपूर्वी योगा टीचरकडून योगाचे वर्ग घेण्यास सुरुवात केली आणि या बहाण्याने त्यांनी योगा टीचरचा विश्वास जिंकला. २३ ऑक्टोबर रोजी तो योगा टीचरला घेऊन शहरात फिरायला गेला.

श्वासोच्छवासाचे विशेष तंत्र वापरून मृत्यूचे नाटक

योगा टीचरच्या म्हणण्यानुसार, शहरात फिरत असताना रेड्डीने तिला शहराबाहेर एका निर्जन ठिकाणी घेऊन गेला. यानंतर त्याने कपडे काढून तिला मारहाण करण्यास सुरुवात केली. मारामारीनंतर मारेकरी सतीश रेड्डीने केबलने गळा आवळून खून करण्याचा प्रयत्न केला. टीचरने आधी बेशुद्ध पडल्याचे नाटक केले. त्यानंतर तिने श्वासोच्छवासाचे विशेष तंत्र वापरून मृत्यूचे नाटक केले. रेड्डीने मृत समजून खड्ड्यात पुरले. यानंतर रेड्डीने आपल्या मित्रांच्या मदतीने योगा टीचरचे दागिने लुटले, माती टाकली आणि घटनास्थळावरून पळ काढला.

गावकऱ्यांच्या मदतीने योग शिक्षक खड्ड्यातून बाहेर आल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यांनी गावकऱ्यांकडून कपडे मागितले आणि नंतर पोलिस ठाणे गाठून तक्रार दाखल केली.

पोलिसांनी पीडित योगा टीचरची वैद्यकीय तपासणी केली

या प्रकरणी बिंदू, सतीश रेड्डीसह ६ जणांना अटक करण्यात आली आहे. पीडित योगा टीचरचीवैद्यकीय तपासणी करण्यात आली. अपहरण, खुनाचा प्रयत्न आणि इतर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ज्या कारमधून योगा टीचरचे अपहरण करण्यात आले होते ती कार काही दिवसांपूर्वी बेंगळुरू येथून चोरीला गेला होती. आरोपी महिला बिंदू आणि सतीश रेड्डीमध्ये ऑनलाईन व्यवहारही झाले आहेत.

महिलांविरुद्धचे गुन्हे वाढत आहेत

दरम्यान, छउठइ च्या अहवालात असे दिसून आले आहे की महिलांवरील गुन्ह्यांचे प्रमाण (प्रति १ लाख लोकसंख्येमागे घटनांची संख्या) २०२१ मध्ये ६४.५ टक्क्यांवरून २०२२ मध्ये ६६ टक्क्यांपर्यंत वाढली आहे. २०२२ मध्ये १९ महानगरांमध्ये एकूण ४८ हजार ७५५ महिलांवरील गुन्ह्यांची नोंद झाली, जी २०२१ च्या तुलनेत १२.३ टक्के अधिक आहे (४३ हजार ४१४ प्रकरणे). एनसीआरबीच्या अहवालानुसार २०२२ च्या गुन्ह्यांच्या आकडेवारीनुसार, महिलांविरोधातील ६५ हजार ७४३ गुन्ह्यांसह उत्तर प्रदेश आघाडीवर आहे. त्यापाठोपाठ महाराष्ट्र (४५३३१ प्रकरणे) आणि राजस्थान (४५०५८ प्रकरणे) आहेत. महिलांविरोधातील गुन्ह्यांच्या बाबतीत पश्चिम बंगाल चौथ्या क्रमांकावर आहे.

# सोमवारी ॲड. प्रकाश आंबेडकर यांची मेहकर येथे जाहीर सभा



दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : मेहकर लोणार विधानसभा निवडणुकीतील वंचित बहुजन आघाडी, क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या अधिकृत उमेदवार डॉ. सौ. ऋतुजा ऋषांक चव्हाण यांच्या प्रचारासाठी वंचित बहुजन आघाडीचे सर्वे सर्वा ॲड्. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांची जाहीर सभा मेहकर येथील यशवंत मैदान नगरपरिषद येथे दि.११ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता आयोजित करण्यात



आली आहे. या सभेला मतदारसघातील मतदारांनी प्रचंड संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार डॉ.सौ. ऋतुजा चव्हाण यांनी केले आहे.

मेहकर लोणार मतदार संघ हा आपल्या ताब्यात घेण्यासाठी वंचित बहुजन आघाडीने सर्व ताकदीनिशी विधानसभेच्या मैदानात उडी घेतली आहे. मतदारसंघातील नागरिकांचाही वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार उच्चशिक्षित व्यक्तिमत्व डॉ. सौ. ऋतुजा ऋषभ चव्हाण यांना उस्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. गावागावात त्यांना नागरिकांकडून पाठिंबा जाहीर केला जात असून मतदार संघात वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवाराला सर्वच स्तरावर उस्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. तर वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार प्रचंड मताने विजयी करावा, यासाठी वंचितचे सर्वेसर्वा ॲड्.प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांची सोमवार दि.११ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता मेहकर येथील यशवंत मैदान नगरपरिषद येथे भव्य प्रचारसभा आयोजित करण्यात आली आहे. यावेळी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जोरदार शक्ती प्रदर्शन करण्यात येणार आहे. वंचित बहुजन आघाडीला मिळत असलेला पाठिंब्याने विरोधकांचे धाबे दणाणले असून या सभेत ॲड्. आंबेडकर काय बोलतात याकडे मतदार संघात राज्याचे लक्ष लागलेले आहेत.

## विविध वृत्त...

### संजय राठोड यांचे भाचे डॉ. महेश चव्हाण हे देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत भाजपात पक्षप्रवेश



दैनिक आपला विदर्भ

**वाशिम/प्रतिनिधी** : आज प्रहारचे अधिकृत उमेदवार आणि मंत्री संजय राठोड यांचे भाचे डॉक्टर महेश चव्हाण यांनी आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत कारंजाच्या एका सभेदरम्यान भाजपमध्ये पक्ष प्रवेश केला आहे. यावेळेस बोलताना महेश चव्हाण यांनी सांगितले गेल्या १० वर्षांपासून मी महेश चव्हाण मित्र मंडळ म्हणून या मतदारसंघात काम करतो आहे. आरोग्य सेवा देतोय तसेच अनेक मोठे प्रश्न या भागामध्ये आहेत, मी प्रहार पक्षाकडून उमेदवारी अर्ज दाखल केला होता मात्र काही किरकोळ करणामुळे माझा उमेदवारी अर्ज बाद करण्यात आला आहे. त्या संदर्भात मी नायालयात याचिका दाखल केली आहे येथील जिल्हा परिषद पंचायत समिती मध्ये आम्ही नेटवर्क उभे केले आहे. संजय राठोड हे जरी नातेवाईक असले तरी ते सुद्धा एक कार्यकर्ता म्हणून चांगले काम करत आहेत. त्यांच्याकडूनच मी सुद्धा प्रेरणा घेऊन मी मागील १० वर्षांपासून मी या भागात काम करत आहे संजय राठोड यांचा आशीर्वाद माझ्या मागे असणार आहे अस महेश चव्हाण यांनी सांगितले आहे.

### आचारसंहिता भंगाचे दोन वेगवेगळे गुन्हे दाखल; सिंहगड रस्ता पोलिसांकडून कारवाई

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी** : आचारसंहिता भंग केल्याप्रकरणी दोन वेगवेगळे गुन्हे सिंहगड रस्ता पोलिसांनी दाखल केले. सिंहगड रस्ता भागातील मानस सोसायटी ते क्रिस्टल कॅस्टल सोसायटी रस्त्याचे कॉक्रीटीकरण सुरू आहे. 'रहिवाशांना होणाऱ्या तसदी बद्दल क्षमस्व, भारतीय जनता पक्षाचे खडकवासाला मतदार संघाचे उमेदवार भीमराव आण्णा तापकीय यांच्या विकास निधीतून' अशा आशयाचा फलक लावण्यात आला होता. फलकावर सौजन्य म्हणून सारंग भोसले असे नाव लिहिण्यात आले होते. आचारसंहितेचा भंग ठरत असल्याने आचार संहिता भंग केल्या प्रकरणी सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अनुराग राजेशकुमार यांनी फिर्याद दिली आहे. आचारसंहिता भंग केल्याप्रकरणी सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात आणखी एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परवानगी न घेता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार मयुरेश वांजळे यांच्या प्रचार कार्यालयामोर गाड्या उभ्या होत्या. गाड्यांवर पक्षाचे चिन्ह आणि छायाचित्र लावण्यात आले होते. आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी दोन मोटारचालकांविरुद्ध सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

### पोर्श कार अपघात प्रकरणावरुन सुनील टिंगरेंकडून शरद पवारांना नोटीस; सुप्रिया सुळे म्हणाल्या...

**पुणे/प्रतिनिधी** : राष्ट्रवादी काँग्रेसनं (शरदचंद्र पवार) वडगाव शेरी या मतदारसंघातून बापू पठारे यांना उमेदवारी जाहीर केलीय. शुक्रवारी (८ नोव्हेंबर) त्यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरदचंद्र पवार) खासदार सुप्रिया सुळे यांनी वडगाव शेरी मतदारसंघात सभा घेतली. या सभेत सुप्रिया सुळे यांनी एक मोठा गौप्यस्फोट केलाय. पुण्यातील पोर्श कार अपघात प्रकरणावरून शरद पवारांना नोटीस पाठवण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. वडगाव शेरीचे आमदार सुनील टिंगरे यांचं नाव न घेता त्या म्हणाल्या. ''इथल्या आमदारानं शरद पवारांना नोटीस पाठवली आहे. पोर्श कार अपघात प्रकरणात माझी बदनामी कराल, तर मी तुम्हाला कोर्टात खेचेन. असं त्या नोटीसमध्ये लिहिलंय'', असं सुप्रिया सुळेंनी सांगितलं.



यावेळी बोलत असताना सुप्रिया सुळे म्हणाल्या की, ''तुम्हाला आश्चर्य वाटेल की ज्यांच्या एबी फॉर्मवर शरद पवार यांनी सही केली होती. त्याच व्यक्तीनं आज शरद पवारांना पोर्श कार अपघात प्रकरणी नोटीस पाठवली आहे. 'माझी बदनामी केली तर मी तुम्हाला कोर्टात खेचेन' असं त्या आमदारानं (सुनील टिंगरे) शरद पवारांना नोटीसीद्वारे बजावलंय. मी त्या व्यक्तीला आव्हान देते करते की, तुम्ही म्हणाल ती वेळ आणि तुम्ही म्हणाल ती जागा. पण मी या अपघात प्रकरणात न्याय मिळाल्याशिवाय गप्प बसणार नाही. तुमच्यात हिंमत असेल तर तुम्ही मला, सुषमा अंधारे आणि आमदार रवींद्र धंगेकर यांना नोटीस पाठवून दाखवा. आम्ही लढू, कारण आम्हाला कोणाची भीती नाही.''

...तर तुमच्या नोटीसला काय घाबरणार? : पुढं त्या म्हणाल्या की, ''आम्ही ना कोणाची बिर्याणी खाल्ली ना कोणाच्या रक्ताचे नमुने बदलले. हे पाप या सरकारनं केलंय. शरद पवारांना तुम्ही नोटीस पाठवली. पण शरद पवार दिल्लीच्या ईडीच्या नोटीसला घाबरले नाही, तर तुमच्या नोटीसला काय घाबरणार?'', असं सवालही सुप्रिया सुळे आमदार सुनील टिंगरे यांना केला. दरम्यान, या प्रकरणात आपण शरद पवार यांना नाही, तर त्यांच्या पक्षाला नोटीस पाठवल्याचं स्पष्टीकरण आमदार सुनील टिंगरे यांनी दिलं आहे.

# लोखंडी ड्रममध्ये अनोळखीच इसमाचे प्रेत आढळले

## खडकपूर्णा नदीपात्रातील घटना : अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी** : किनगाव राजा पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या दुसरबीड येथील खडकपूर्णा नदीपात्रात सकाळी ७:३० वाजेदरम्यान लोखंडी ड्रम मध्ये एका अनोळखी इसमाचे प्रेत आढळले.ही घटना दि.८ नोव्हेंबर रोजी उघडकीस आली असून याप्रकरणी पोलिसांनी अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या घटनेमुळे परीसरात एकच खळबळ उडाली असून ओळख पटवण्याचे काम चालू आहे. घटनेबाबत प्राप्त माहितीनुसार, दुसरबीड येथील खडकपूर्णा नदीपात्रातील कोल्हापुरी बंधार्यातील पाण्यात दि.८ नोव्हेंबर रोजी ऐका अनोळखी इसमाचे प्रेत लोखंडी ड्रम मध्ये असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

या माहितीवरून पोलीसांनी घटनास्थळी पोहचून सदर ड्रम मध्ये पाहिले असता सदर पोत्यात २५ ते ३० वर्षाचा मुत पुरुष व पोत्यात बांधलेल्या अवस्थेत आढळून आला. असून घटनास्थळाचा पंचनामा करून किनगाव पोलीसांनी अपराध क्रमांक २५७/२०२४ कलम १०३(१), २३८ भारतीय न्याय संहिता नुसार गुन्हा दाखल केला. सदर अनोळखी मृत इसमांस आज्ञात व्यक्तीने आज्ञात कारणावरून कोणत्यातरी हत्याराने डोक्यावर मारून जिवानीशी ठार मारून पुरावा नाहीसा करणेकामी प्रेत लोखंडी ड्रममध्ये टाकुन खडकपूर्णा नदीचे पात्रात पाण्यामध्ये फेकुन दिले आहे. सदर अनोळखी मृत पुरुष हा अंदाजे २५ ते ३० वर्ष वयाचा असुन अंगात काळया रंगाचे फुल बायाचे जाकेट ज्यावर पीनउट जॅकेटअसे छापलेले, काळया रंगाची हाप पेंट, कथीया रंगाची माचो कंपनीची अंडरवियर, सांध-या रंगाची सैंडो बनियान, सोनी कंपनीचे हेडफोन ब्ल्यु टुथ व त्याच्या हातावर रघवीर असे नाव असून एक मोटार सायकलची चाबी मिळून आली आहे.

सदर प्रेतावर उत्तरीय शेवविच्छेदन कारवाई साठी जिल्हा सामान्य रुग्णालय बुलडाणा येथे पाठविले आहे. सदर घटनास्थळी अपर पोलीस अधिक्षक महामुनी, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाटील, लांडे एलसीबी बुलडाणा यांनी भेट दिली असून गुन्ह्याचा पुढील तपास ठाणेदार विनोद नरवाडे, जमादार गणेश डोईफोडे पोकॉ. सुभाष गीते हे करीत आहेत. सदर अज्ञात व्यक्ती बद्दल कोणाला काही माहिती असल्याच किनगाव राजा पोलीसांशी संपर्क साधण्याचे आवाहन ठाणेदार विनोद नरवडे यांनी केले आहे.

### मंत्री सत्तार यांच्या संस्थेच्या २३ मुख्याध्यापकांविरुद्ध गुन्हा, निवडणूक कामात हलगर्जीपणा

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या आदेशाचा भंग केल्याप्रकरणी सिल्लोड मतदारसंघातील २३ मुख्याध्यापकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सिल्लोड पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी अनिल बन्सी पवार यांनी या संदर्भाने तक्रार दाखल केली असून, त्यावरून सिल्लोड ग्रामीण, सिल्लोड शहर ठाण्यात अनुक्रमे ९ व ८, तर अजिंठा पाच आणि वडोदबाजार पोलीस ठाण्यात एका मुख्याध्यापकावर गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नॅशनल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष म्हणून मंत्री अब्दुल सत्तार हे काम पाहतात. त्यामुळे त्यांना हा दणकाच असल्याचा आरोप शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे रघुनाथ घारमोडे यांनी केला आहे. सिल्लोड ग्रामीण पोलीस ठाण्यात अंधारी येथील नॅशनल मराठी हायस्कूलचे हकीम खाँ दौलत खाँ पठाण, हिंदुस्थान ऊर्दू हायस्कूलचे काजी इक्रमोद्दीन, हिंदूस्थान उर्दू प्राथमिक शाळेचे मो. खलील शेख, डोंगरगाव येथील नॅशनल मराठी हायस्कूलचे प्रताप तुकाराम बदर, प्रगती ऊर्दू हायस्कूलचे सरफराज शेख, नॅशनल मराठी प्राथमिक शाळेचे विजय वाघ, किरहाडा येथील नॅशनल ऊर्दू प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक (नाव नोंद नाही), घाटनांद्रा येथील नॅशनल मराठी प्राथमिक शाळेचे संदीप विठ्ठल सपकाळ व नॅशनल उर्दू प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक अशा वरील सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### प्रचारामध्ये महिला संदर्भात आक्षेपार्ह टिप्पणी नको ,बालकांचा वापर ही नको; जिल्हा प्रशासनाचे निर्देश

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी** : भारत निवडणूक आयोगाने आचारसंहितेमध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे निवडणूक प्रचारादरम्यान महिलांचा सन्मान राखला गेला पाहिजे. प्रचारादरम्यान महिलांसंदर्भात कोणतीही आक्षेपार्ह टिप्पणी करण्यात येऊ नये, तसेच मुलांचा वापर प्रचारामध्ये कुठेही होणार नाही. याची सर्व राजकीय पक्षानी तसेच उमेदवारांनी काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणूक प्रचाराच्या अंतिम टप्प्यात येत असून अशा वेळी प्रचारासंदर्भातील आदर्श आचारसंहितेचे पालन करणे अत्यावश्यक आहे. जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी आज या संदर्भात प्रशासनातर्फे सर्व उमेदवारांना तसेच राजकीय पक्षांना याबाबत सूचना केली आहे. अनेक ठिकाणी प्रचारामध्ये शाळकरी मुलांचा किंवा लहान मुलांचा अनावधानाने वापर केला जातो मात्र हा आचारसंहितेचा भंग ठरतो. यासंदर्भात तक्रारी आल्यास त्यावर कारवाई केली जाते. त्यामुळे उमेदवारांनी आपल्या प्रचारामध्ये कुठेही लहान मुलांचा वापर होणार नाही, याची काळजी घ्यावी. उमेदवारांनी प्रचारादरम्यान आपली उपलब्धी आपले भविष्यातील नियोजन सांगताना कुठेही महिलांबाबत आपत्तीजनक टिप्पणी अजानतेपणे का होईना सार्वजनिक होणार नाही, याची काळजी घ्यावी. महिलांसंदर्भातील अनावश्यक टिप्पणी, अनादर अपमानजनक शब्द, लज्जा निर्माण होईल असे शब्द वापरल्यास आचारसंहिता भंग केल्याचे गुन्हे दाखल करण्याचे निर्देश आयोगाने दिले आहे. त्यामुळे यासंदर्भात काळजी घ्यावी. असे आवाहनही त्यांनी केले आहे.

### संजू सॅमसनने धोनीला मागे टाकत केला खास पराक्रम

**मुंबई/प्रतिनिधी** : भारतीय संघाचा यष्टीरक्षक फलंदाज संजू सॅमसन सध्या तुफान फॉर्मध्ये असून त्याची बॅट मैदानावर आग ओकताना दिसत आहे. त्याने सलग दुसऱ्या टी-२० सामन्यात शतक झळकावत विक्रमांची रांग लावली आहे. डरबनच्या किंग्समीड मैदानावर दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळल्या गेलेल्या चार सामन्यांच्या टी-२० मालिकेतील पहिल्या सामन्यात संजू सॅमसनने १०७ धावांची उत्कृष्ट खेळी केली. ज्याच्या जोरावर भारताने ६१ धावांनी विजय मिळवला. यादरम्यान संजू सॅमसने आपल्या विस्फोटक खेळीने भारताचा माजी कर्णधार एमएस धोनीचा मोठा विक्रम मोडला.

संजू सॅमसनने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या टी-२० सामन्यात केवळ १०७ धावांची इनिंग खेळली नाही, तर टी-२० क्रिकेटमध्ये ७००० धावाही पूर्ण केल्या. संजूने त्याच्या २६९ व्या टी-२० डावात हा आकडा गाठला आहे. यासह तो जलद ७००० धावा पूर्ण करणारा भारताचा संयुक्त सातवा खेळाडू ठरला आहे. संजूने या बाबतीत टीम इंडियाचा माजी कर्णधार आणि अनुभवी यष्टीरक्षक फलंदाज एमएस धोनी आणि दिनेश कार्तिक यांना मागे टाकले आहे. धोनीने ३०५ डावात ७००० टी-२० धावा पूर्ण केल्या होत्या.

भारतासाठी टी-२० मध्ये सर्वात जलद ७००० धावा पूर्ण करणारे खेळाडू : केएल राहुल – १९७ डाव विराट कोहली – २१२ डाव शिखर धवन – २४६ डाव सूर्यकुमार यादव – २४९ डाव सुरेश रैना – २५१ डाव रोहित शर्मा – २५८ डाव संजू सॅमसन – २६९ डाव रॉबिन उथप्पा – २६९ डाव एमएस धोनी – ३०५ डाव दिनेश कार्तिक – ३३६ डाव टी-२० क्रिकेटमध्ये सर्वात जलद ७००० धावा पूर्ण करण्याचा विक्रम –

टी-२० क्रिकेटमध्ये सर्वात कमी डावात ७००० धावा पूर्ण करण्याचा विश्वविक्रम सध्या पाकिस्तानी संघाचा माजी कर्णधार बाबर आझमच्या नावावर आहे, ज्यांनी केवळ १८७ डावांमध्ये हा आकडा गाठला. यानंतर दुसऱ्या क्रमांकावर ख्रिस गेलचे नाव येते, ज्याने १९२ डावांमध्ये ७००० टी-२० धावा पूर्ण करण्यात यश मिळवले.

# मागच्या काळात मुस्लिम समाजातील धर्मगुरुंनी मागील निवडणुकी काळात फतवा काढण्यासाठी लाच घेतली असेल- प्रतापराव जाधव

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : मुस्लिम समाजातील धर्मगुरूंनी मागील निवडणुक काळात फतवा काढण्यासाठी लाच घेतली असेल असे वादग्रस्त विधान देशाचे केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले. त्यांनी मेहकर येथे आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी हे विधान केले. राज्यामध्ये सध्या विधानसभा निवडणुकीचे वारे वाहू लागलेले आहेत. उमेदवारांचा प्रचार अंतिम टप्प्यात आहे. अशा वेळेस देशाचे केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर येथे आयोजित पत्रकार परिषदेत यांनी वादग्रस्त विधान केले आहे. केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव




म्हणाले की, मुस्लिम समाजाने लोकसभा निवडणुकीमध्ये फतवे काढून मतदान केले नाही असे असतानाही महायुती सरकारने राज्यातील मुख्यमंत्र्यांसाठी सर्वच योजना दिल्या त्यामध्ये लाडली बहीण योजना असो की शेतकऱ्यांसाठीच्या योजना कोणताही दुजाभाव केलेला नाही. असे असतानाही जर मुस्लिम समाज मतदान करणार नाही आणि फतवे काढत असेल केवळ धर्मांधपणा करत असेल तर ते लोक मतदान करणार नाहीत. मागच्या काळात मुस्लिम समाजातील धर्मगुरुंनी मागील निवडणुकीच्या काळात फतवा काढण्यासाठी लाच घेतली असेल असे वादग्रस्त विधान देशाचे केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले आहे.

# निवडणुकीच्या धामधुमीत महाराष्ट्रात २८० कोटीचं घबाड पकडलं, आतापर्यंतच्या कुठे कुठे किती रोकड सापडली!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकांची चुरस रंगात आली आहे. निवडणूक आयोगाच्या उड्डाण पथकानं आणि पोलिसांच्या पथकानं गेल्या दोन दिवसांत मुंबई महानगर प्रदेशातील विविध ठिकाणांहून ७.३ कोटी रुपये आणि प्रेशर कुकर असलेलं वाहन जप्त केल्याची माहिती मिळत आहे.

एका अधिकाऱ्यानं दिलेल्या माहितीनुसार, प्रेशर कुकर असलेल्या वाहनाबाबत दुसऱ्या पक्षाकडून प्रचार सुरू असताना माहिती मिळाली होती. ते म्हणाले की, ऐरोली मतदारसंघातून अपक्ष उमेदवार असलेलं आणि प्रेशर कुकर 'निवडणूक चिन्हावर' निवडणूक लढवत असलेल्या विजय चौघुले यांचं पोस्टर वाहनाच्या पुढच्या सीटवर आढळून आलं आहे.

विविध ठिकाणांहून जी रोख जमा करण्यात आली त्याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई पोलिसांनी गुरुवारी रात्री दक्षिण मुंबईतील काळबादेवी येथे १२ जणांकडून २.३ कोटी रुपये रोख जप्त केले. एवढ्या मोठ्या प्रमाणात पैसे घेऊन जाण्याचं कारणही ते सांगू शकले नाहीत.

दुसऱ्या जप्तीमध्ये मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलिसांनी बुधवारी नाकाबंदीदरम्यान एका एटीएम व्हॅनची झडती घेतली. त्यात साडेतीन कोटी रुपये सापडले, जे जप्त करण्यात आले, व्हॅनमध्ये उपस्थित असलेल्या दोघांनी सुमारे ४० लाख रुपयांची माहिती दिली. पण, उर्वरित रकमेबाबत स्पष्ट माहिती देऊ शकलो नाही. ही रोकड खासगी बँकेची असल्याचा दावा केला जात आहे. मात्र, कागदपत्र नसल्याम ुळे ही रोकड जप्त करण्यात आल्याची माहिती मिळत आहे. आणखी एका ठिकाणी मुंबई-अहमदाबाद हायवेवर नाकाबंदी दरम्यान, एका गाडीनं १.५ कोटी रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे.

दरम्यान, महाराष्ट्रातील निवडणुकांची घोषणा झाल्यानंतर जवळपास २८० कोटी रुपये जप्त करण्यात आले. जे गेल्या निवडणुकीत जप्त करण्यात आलेल्या रोख रकमेपेक्षा खूप जास्त आहेत. एकट्या राज्यात ७३.११ कोटी रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे. ३७.९८ कोटी रुपयांची दारू, ३७.७६ कोटी रुपयांचे ड्रग्ज आणि ९०.५३ कोटी रुपयांच्या मौल्यवान वस्तूही जप्त करण्यात आल्या आहेत. याव्यतिरिक्त, ज्या मतदारसंघांमध्ये प्रलोभन दाखविण्याची अधिक शक्यता आहे, राज्यभरातील असे ९१ मतदारसंघ खर्च संवेदनशील मतदारसंघ म्हणून चिन्हांकित केले आहेत.

